T R U E C O P Y

परदेशातील औद्योगिक प्रदर्शनात भाग घेणाऱ्या लघु उद्योग घटकास जागेच्या भाडयापोटी 50 टक्के दराने भुईभाडे अनुदान देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

व्यापार,वाणिज्य व खनिकर्म विभाग

शासन निर्णय क्रमांक : एफईएक्स-1079/प्र.क्र.223/कार्यासन-2

मंत्रालय, मुंबई 400 032.

दिनांक : 24 जानेवारी 2001.

वाचा: 1) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय, क्रमांक-आयएसई/1496 (314/96),दिनांक 03.07.1996.

2) महाराष्ट्र राज्य निर्यात प्रचालन परिषदेच्या दुसऱ्या बैठकीतील दिनांक 22.01.1999 रोजी झालेला निर्णय.

3) शासन निर्णय क्रमांक- एफईएक्स-1097/प्र.क्र.223/कार्यासन-2, मंत्रालय,मुंबई- 400 032 दिनांक 31 मार्च,2000.

4) व्यापार,वाणिज्य व खनिकर्म विभाग क्रमांक- व्यावाख-1098/ प्र.क्र.226/कार्या.-1, दिनांक 06.06.2000 अन्वये निर्गमित केलेले शुध्दिपत्रक.

प्रस्तावना:

राज्यातील औद्योगिक उत्पादनाच्या निर्यातीत वाढ व्हावी म्हणून राज्यातील लघु उद्योजकांना परदेशातील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत भाग घेताना, भुईभाडयासाठी येणाऱ्या खर्चाच्या 50% भुईभाडे अनुदान म्हणून दिले जाते. सदर योजना 1970-71 पासून राबविली जात असून त्याकरिता लागणारा निधी हा उद्योग,ऊर्जा व कामगार विभागातर्फे उपलब्ध् केला जात होता. त्या विभागाच्या शासन निर्णय क्र.आयएसई/1496 (314/96)/प्रशासन-3,दिनांक 03.07.1996 अन्वये उद्योग संचालनालयातील निर्यात

विभागाचे प्रशासकीय अधिकार व्यापार,वाणिज्य व खनिकर्म विभागास प्रदान करण्यात आलेले आहेत.

सदर योजनेमध्ये जे लघु उद्योजक परदेशातील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत, इंडियन ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशन, नवी दिल्ली हया भारत सरकारच्या अंगिकृत असलेल्या संस्थेकडून आयोजित केलेल्या प्रदर्शनातून भाग घेऊन, त्या प्रदर्शनात सहभागी झाल्याचे संबंधित संस्थेकडून प्रमाणित करुन आणतील. अशा लघु उद्योजकांनाच या योजनेचा लाभ घेता येत होता. या अटीमुळे इंडियन ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशन, नवी दिल्ली या संस्थेव्यतिरिक्त इतर संस्थेने आयोजित केलेल्या परदेशातील प्रदर्शनांत सहभागी झालेल्या लघु उद्योजकांना हया योजनेचा लाभ घेता येत नव्हता. त्यामुळे मर्यादित लघु उद्योजकच हया योजनेचा लाभ घेत होते.

सन 1991 च्या केंद्र सरकारच्या उदारीकरणाच्या व शिथिलीकरणाच्या औद्योगिक धोरणाचा महाराष्ट्र राज्याने स्वीकार केल्यामुळे सदर मुद्यावर महाराष्ट्र राज्य निर्यात प्रचालन परिषदेत दिनांक22.01.1999 रोजी मा. मंत्री (व्यापार,वाणिज्य व खनिकर्म विभाग) महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या बैठकीमध्ये वरील बाबत चर्चा करण्यात आली. वरील सर्व बाबींचा विचार करुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय:</u>

राज्यातील जे लघु उद्योग देशातील किंवा परदेशातील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये सहभाग घेतील त्यांना, इंडियन ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशन, नवी दिल्ली संबंधित निर्यात प्रचालन परिषदा/संस्था तसेच महाराष्ट्र राज्य निर्यात प्रचालन परिषदेकडून सदर प्रदर्शनात भाग घेतल्याबाबतचा पुरावा सादर केल्यानंतर, त्यांनी भुईभाडयासाठी खर्च केलेल्या रक्कमेच्या 50 टक्के रक्क्म किंवा रु. एक लाख यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम कोणत्याही एका आर्थक वर्षात अनुदान म्हणून मंजूर करण्यात येईल. सदर योजनेचा लाभ हा लघु उद्योजकांना एकूण 5 (पाच) प्रदर्शनासाठीच मर्यादित असेल. ज्यांनी सदर योजनेचा लाभ यापूर्वी 5 वर्षांपेक्षा जास्त किंवा 5 प्रदर्शनांपेक्षा जास्त वेळा

घेतला असेल त्यांना सदर अनुदानाचा लाभ घेता येणार नाही. सदर अनुदान देण्याकरीता कृषी उद्योग, ग्रामोद्योग आधि मत्स्य/सागरी उत्पादन करणाऱ्या लघु उद्योग घटकांना प्राधान्य दिले जाईल.

देशातील कोणतेही प्रदर्शन आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी आणि सदर प्रदर्शनात भाग घेतलेल्या लघु उद्योग घटकांना, त्यांनी खर्च केलेल्या भुईभाडयाच्या 50 टक्के अनुदान देण्याबाबतच्या सर्व लघु उद्योग घटकांच्या अर्जावर निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यांत येत आहे.

1. सचिव (व्यावाख) — अध्यक्ष
2. विकास आयुक्त (उद्योग) — सदस्य
3. व्यवस्थापकीय संचालक (मलउविम) — सदस्य
4. सह/उप सचिव (वित्त विभाग) — सदस्य
5. उप सचिव (नियोजन विभाग) — सदस्य
6. अतिरिक्त उद्योग संचालक — सदस्य सचिव

2. ज्या उद्योग घटकाने इंडियन ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशन किंवा संबंधित निर्यात प्रचालन परिषदेतर्फे आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात भाग घेतल्याबाबत दाखला दिला असेल अशाच घटकांना हे अनुदान वितरित करण्यात यावे. याबाबत शासन धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

3. या समितीची बैठक प्रत्येक तीन महिन्यातून एकदा घेण्यात येऊन बैठकीपूर्वी प्राप्त झालेल्या सर्व अर्जांवर निर्णय घेण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
(जे.पी.डांगे)
सचिव

प्रति,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-1, मुंबई.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-2, नागपूर.

अधिदान व लेखाधिकारी,मुबई

निवासी लेखा परिक्षा अधिकारी- मुंबई-32.

वित्त विभाग (व्यय-16), मंत्रालय, मुंबई-32.

नियोजन विभाग (का-1433), मंत्रालय, मुंबई-32.

सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन,मुंबई.

कार्या-1 (अर्थसंकल्प), व्यापार,वाणिज्य व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-32.

सचिव कक्ष.

निवडनस्ती/कार्या-2.